
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

Tribal Studies Center (आदिवासी अध्यासन केंद्र)

# आदिवासी संस्कृती, इतिहास व पारंपारिक ज्ञान दस्तऐवजीकरण संशोधन फेलोशिप

## लघु संशोधन प्रकल्प (MRP) 2026-27
## टप्पा – II

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील आदिवासी अध्यासन हे आदिवासी समाजाशी संबंधित विविध उदयोन्मुख विषय, आदिवासी जीवन, इतिहास व संस्कृती यांवर संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे. आदिवासी समाजाचे जीवन, इतिहास व संस्कृती यांचे जतन व दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने केंद्रामार्फत "आदिवासी संस्कृती, इतिहास व पारंपारिक ज्ञान दस्तऐवजीकरणासाठी संशोधन फेलोशिप - लघु संशोधन प्रकल्प (MRP) २०२६-२७" या उपक्रमाचा टप्पा-II सुरू करण्यात येत आहे.

आदिवासी अध्यासन केंद्रामार्फत आदिवासी जीवन, संस्कृती, इतिहास व जीवनपद्धतीशी संबंधित विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन प्रस्ताव सादर करण्यासाठी संशोधकांना आवाहन करण्यात येत आहे. आदिवासी अध्ययनाच्या क्षेत्रात सैद्धांतिक, संकल्पनात्मक, शास्त्रीय व धोरणात्मक योगदान देणाऱ्या संशोधन प्रकल्पांना संशोधन अनुदान, आर्थिक सहाय्य व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या माध्यमातून आदिवासी समाजाविषयीच्या ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, संकलन, जतन, संवर्धन व प्रसार करणे, आदिवासी सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे तसेच नाविन्यपूर्ण व आंतरशाखीय संशोधनास प्रोत्साहन देणे, हे केंद्राचे उद्दिष्ट आहे.

## संशोधन फेलोशिप विषय

1. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी जमातीची नातेसंबंध पद्धती
2. गोंड-माडिया जमातीची सगा व्यवस्था (गडचिरोली जिल्हा)
3. गोंड-माडिया जमातीची विवाह परंपरा (भामरागड व एटापल्ली तालुका)
4. गोटूल व्यवस्था (भामरागड व एटापल्ली तालुका)

## कोण अर्ज करू शकतात?

1. गोंडवाना विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तर (PG) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी अर्ज करू शकतात.
2. गोंडी, माडिया तसेच इतर आदिवासी भाषांमध्ये संवाद साधता येणाऱ्या स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.
3. सदर संशोधन प्रकल्प हा एम.फिल./पीएच.डी. संशोधनाचा भाग किंवा इतर कोणत्याही संशोधन प्रकल्पाचा भाग नसावा.

## फेलोशिप

संशोधनार्थींना दरमहा रु. १०,०००/- संशोधन फेलोशिप देण्यात येईल.
आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठामार्फत लघु संशोधन प्रकल्पांचा कालावधी १२ महिने असेल.
१० महिने - क्षेत्रीय संशोधन / क्षेत्रभेटी
२ महिने - संशोधन अहवाल लेखन

**अर्ज करण्याची अंतिम तारीख : २४ ऑक्टोबर २०२६**


tribalstudiescenter@unigug.ac.in
Contact: 9923359126

अधिक माहितीसाठी : डॉ. वैभव मसराम, समन्वयक (आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली )

# Gondwana University, Gadchiroli

## Tribal Studies Center

Proposal for the Minor Research Project (MRP)

**Guidelines for Minor Research Project**

**2026 - 2027**

**PREAMBLE: -**

Preservation of Tribal culture and life is one of the major objectives of the Tribal Studies Center. The Tribal Studies Center (**TSC@GUG**), Gondwana University, Gadchiroli attempts to promote research in various Emerging areas of Tribal issues, life, history, and culture. The Tribal Studies Center (**TSC@GUG**), Gondwana University, Gadchiroli has initiated a Minor Research Project from the session 2026-27 for all who have completed their PG Students of the same University. The vision for Calls a Minor Research Project proposal to preserve tribal life, history and culture and provides research grants to research projects. (**TSC@GUG**) proposes to provide funding to research scholars to conduct innovative research in various fields of Tribal life that have theoretical, conceptual, methodological, and policy implications. Tribal communities have unique cultural qualities and philosophical views of their world. Due to certain factors, most tribal communities' philosophical views of their life are unknown to the other mainstream communities. It is truly relevant to understand, document, and preserve the tribal philosophical thoughts of its community and intellectual system. The oral narratives are the storehouse that needs to be analyzed and interpreted to know the Tribes' Nature and their ways of Life.

The tribal communities are proud to have many legends, legendary characters, and their extraordinary works. The tribal communities are known for possessing a treasure of proverbial expressions. Traditionally, knowledge has been constituted, stored, and maintained in the framework of oral culture. Traditional Knowledge (TK) is crucial to a community's integrity. These knowledge systems are vital to people's livelihoods. However, the proceeds from these inventions rarely make their way back to the communities that created them. It is important to encourage indigenous peoples' right to preserve and protect their TK.

Tribal Studies Center, Gondwana University, Gadchiroli undertook measures to document tribal cultural tradition and called for a research proposal on the documentation of Tribal culture history and life. Tribal community with a rich and diverse cultural legacy. It has a mosaic of tribal and folk arts. The Indian way of life is rich in rituals, customs, beliefs, and a diverse group of gods and goddesses.

## 1. THE OBJECTIVES OF THIS SCHEME ARE AS BELOW:-

1. To help students start research that has the potential to provide solutions to the Problems of the adjoining society.
2. To carry out pilot studies on topics relevant to tribal and deprived communities in Gadchiroli and Chandrapur districts.
3. To promote interdisciplinary collaboration in emerging areas of local relevance.
4. To clearly state our present knowledge in the proposed study both at National and international level and how the proposed study will be a new addition to existing knowledge.
5. To Preserve the traditional knowledge, history and culture of tribes of the region.

## 2. TARGET GROUP (ELIGIBILITY) :-

1. Post Graduate passed students from Post Graduate Teaching Departments and affiliated colleges from Gondwana University, Gadchiroli.
2. The preference shall be given to the students who can communicate in Gondi, Madia and other tribal Languages.
3. The research project should not be a part of M.Phil./Ph.D. work or any other research project.

## 3. THE FOLLOWING ARE THE BROAD POINTS WHICH WILL BE COVERED IN THE PROPOSED RESEARCH PROJECT :-

- **Cultural Preservation**: Projects aimed at preserving and promoting indigenous languages, history, arts, crafts, traditional knowledge, and cultural practices.

**The broad disciplines of study, within the domain of Tribal culture, history and life, are:**

1. Tribal history and culture **2.** Indigenous Knowledge System. **3.** Material Culture of Tribal Communities. **4.** Environment and Nature. **5**.Gender in Tribal Society. **6.** Health and Well-being. **7.** Rituals of Tribal Communities. **8.** Tribal Religion. **9.** Profession and Livelihood of Tribal People. **10.** Family Structure of Tribal Communities. **11.** Social Organization of Tribal Communities. **12.** Community and Education. **13**. Performing Art of Tribal Communities. **14.** Art and Craft of Tribal Communities. **15**. Community and Development. **16.** Community and Modern Technology. **17.** Community and Nationalism. **18.** Fieldwork, Documentation and Archive. **19.** Tribal language. **20.** Folk Literature of Tribal Communities. **21.** Genres in Oral Narratives. **22.** Musical instruments and songs.

## 4. CATEGORIES OF RESEARCH PROJECTS :-

The Tribal Studies Center, GUG, Minor Research Projects will be awarded for 12 months (10 months field project & 2 months report writing) with a budget of up to Rs.1,20,000/- research fellowship for each research scholar (Per month Rs. 10,000/-)

## 6. HOW TO APPLY :-

1. The applications are invited through an advertisement on GUG website, social media platforms of GUG and if required, in print media.
2. The applicants shall submit an online/offline application which includes the research proposal in the given prescribed format. (The office of Coordinator, Tribal Studies Center, Gondwana University, Gadchiroli, MIDC Road Complex, Maharashtra- 442605) Email- tribalstudiescenter@unigug.ac.in
3. The Applicants must submit an abstract & a detailed Research Proposal in the prescribed format.
4. Research proposals and final reports should be in Marathi, Hindi, or English.

## 7. PROCEDURE FOR AWARDS :-

1. Applications would be initially scrutinized by the office of Tribal Studies Center, GUG for their completeness. In case there are any suggestions for improvement, the same would be sent to the scholar(s) before the presentation.
2. All the short-listed scholars would then be invited for a Power Point Presentation before the Expert Committee at the Tribal Studies Center, GUG.
3. A list of Selected scholars shall be displayed on the website of GUG.
4. Research supervisor will be allotted by Tribal studies center, GUG.
5. Mentors will be provided by the Tribal studies center, GUG.

## 5. OTHER INFORMATION AND GUIDELINES :-

1. The area or focus of Research is primarily expected to be rural and tribal areas of Gadchiroli and Chandrapur District.
2. For initiation for a research project, researchers should submit the approval letter from *Gram Sabha* Chairperson or *Sarpanch*.
3. The researcher can avail himself of only one project/ scheme of the Tribal Studies Center, GUG, at any given time.
4. The researcher shall have a Supervisor and a mentor for a project.
5. The researcher and the Supervisor shall be accountable for accounts, funds, and completion of the project.
6. The Research Scholars should submit progress reports regularly as stipulated by the administration.

## 8. JOINING AND RELEASE OF GRANTS: -

1. The fixed amount of Rs.10,000/- (For Twelve months only) will be disbursed to Research student scholars, subjected to the requirements, as mentioned in the Sanction Letter. No additional amount will be paid to research scholars by the (**TSC@GUG**) for field work and report writing.
2. The research fellowship shall be released after submission of a per month progress report and final installment shall be released only after final submission of Minor Research Project.
3. All field work related expenses of research students are expected to meet from the fellowship authorized by (**TSC@GUG**).
4. Final installment will be issued after receipt of the recommendation of the expert for acceptance of the Final Report, Audited statement of accounts (A/C) in prescribed format, verification of all progress reports, final summary, and other necessary documents.

## 9. MONITORING OF RESEARCH PROJECTS :-

1. GUG shall constitute an MRP Tribal Studies Center, Advisory Board to monitor the project's progress.
2. All project-related queries will be addressed to the coordinator, of MRP, Tribal Studies Center for their timely reply.
3. Research undertaken by a research scholar will be reviewed through the submission of monthly progress reports in the prescribed format and the project may be discontinued/terminated if research progress is not found satisfactory or on account of the violation of rule/rules of Tribal Studies center, GUG.
4. Final reports submitted by the scholars shall be evaluated by an Evaluation Committee, MRP Tribal Studies center, GUG before considering the release of the final installment.
5. The Authenticity of the Final research project (Video and audio) shall be the letter of approval by the Gram *Sabha* Chairperson or *Sarpanch*.
6. If the scholars fail to submit the requisite documents and the final report or do not complete the project in a stipulated period, the scholars will be blacklisted.

## 10. COMPLETION OF THE STUDY :-

1. On completion of the study, the research scholar shall submit a Final report in the prescribed form.
2. The final report submitted by the scholar will be considered as satisfactory only after final recommendation of acceptance by the expert appointed by the GUG.
3. The University may publish the findings of the research completed under this scheme at appropriate platforms/places. The researcher should submit a no-objection certificate at the time of final report submission.

# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# आदिवासी अध्यासन केंद्र

# लघु संशोधन प्रस्ताव -२०२६ -२०२७

**प्रस्तावना:-** आदिवासी भाषा, इतिहास, कला, हस्तकला, पारंपारिक ज्ञान आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करने जतन करणे हे आदिवासी अध्यासन केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारे आदिवासी समस्या, जीवन, इतिहास आणि संस्कृतीच्या विविध उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये संशोधनाला चालना देण्याचा प्रयत्नाचा एक भाग म्हणुन शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून गोंडवाना विद्यापीठ अंतर्गत पद्व्यूत्तर अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्याकरिता लघु संशोधन प्रस्ताव अंतर्गत रिसर्च फेलोशिप सुरू केलेली आहे. रिसर्च फेलोशिप अंतर्गत आदिवासी जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये सैद्धांतिक, वैचारिक आणि धोरणात्मक परिणाम असलेले नाविन्यपूर्ण संशोधन करण्यासाठी संशोधक विध्यार्थ्यांना फेलोशिप देण्यात येणार आहे. या अंतर्गत आदिवासी समाजातील तात्विक विचार समजून घेणे, दस्तऐवजीकरण करणे (विडीओ व लिखित) ,बौद्धिक व्यवस्थेचे जतन करणे, समाजातील  मौखिक कथाचे विश्लेषण आणि व्याख्या करणे आवश्यक आहे. आदिवासी समुदायांना अनेक महान क्रांतिकारक, पौराणिक पात्रे आणि त्यांच्या असामान्य कार्यांचा अभिमान आहे. आदिवासी जमाती लौकिक अभिव्यक्तींचा खजिना ठेवण्यासाठी ओळखल्या जातात. पारंपारिकपणे, मौखिक संस्कृतीच्या चौकटीत ज्ञान तयार केले गेले, संग्रहित केले गेले आणि राखले गेले.  हे ज्ञान पारंपारिक ज्ञान समुदायाच्या अखंडतेसाठी महत्त्वपूर्ण आहे. या ज्ञान प्रणाली लोकांच्या उपजीविकेसाठी आवश्यक आहेत. स्थानिक लोकांच्या पारंपारिक ज्ञानांचे संरक्षण आणि संरक्षण करण्याच्या अधिकारांना प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे.

आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी आदिवासी सांस्कृतिक परंपरेचे व जीवनपद्धतीकचे  दस्तऐवजीकरण करण्यासाठी आदिवासी क्षेत्रातील संशोधकाकडून शोध प्रस्ताव मागवीत आहे. शोध प्रस्ताव अंतर्गत संशोधक एक वर्ष कालावधी करीता एका इलाका (भाग) मध्ये येणारे गावामधील आदिवासी प्रथा,परंपरा,जीवन पद्धत,साहित्य,कविता व लोक कला व साहित्य यांचे लिखित व व्हिडिओ दस्तऐवजीकरण करून त्यावर सविस्तर लघु संशोधन प्रस्ताव आदिवासी अध्यासन केंद्र कडे सादर करील.समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा असलेला आदिवासी समुदाय. लोककला, भारतीय जीवनपद्धती, चालीरीती, श्रद्धा आणि असणाऱ्या  विविध देवी-देवतांच्या समूहाने समृद्ध आहे. पारंपारिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण च्या माध्यमातून आदिवासी समाज व संस्कृतीचे वास्तविक व मान्यताप्राप्त  संशोधन समोर आणणे हे अध्यासन केंद्राचे प्रमुख कार्य आहे.

**योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:-**

१) आदिवासी भाषा, इतिहास, कला, हस्तकला, पारंपारिक ज्ञान आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करणे.

२) गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी आणि वंचित समुदायांशी संबंधित मान्यताप्राप्त संशोधन समोर आणणे.

**पात्रता:-**

१) संशोधक विद्यार्थी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत पदव्युतर शैक्षणिक विभाग व सलाग्नित महाविद्यालय येथुन कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर परीक्षा (PG) पास केलेली असावी.

२) गोंडी आणि माडिया व इतर आदिवासी भाषांमध्ये संवाद साधू शकणाऱ्या स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल.

३) संशोधन प्रकल्प M.Phil./Ph.D चा भाग किवा इतर संशोधन प्रकल्पाचा भाग नसावा.

**संशोधन प्रस्तावा अंतर्गत खालील विषयांचा समावेश राहील:-**

आदिवासी भाषा, इतिहास, कला, हस्तकला, पारंपारिक ज्ञान आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करणे या क्षेत्रांतर्गत संशोधनाचे खालील विषय आहेत:

**१)** आदिवासी इतिहास आणि संस्कृती **२)** स्वदेशी ज्ञान प्रणाली. **३)** आदिवासी समाजाची भौतिक संस्कृती **४)** पर्यावरण आणि निसर्ग **५)** आदिवासी समाजातील लिंग **६)** आरोग्य आणि कल्याण. **७)** आदिवासी समाजाचे विधी **८)** आदिवासी धर्म **९)** आदिवासी लोकांचे व्यवसाय आणि उपजीविका **१०)** आदिवासी समाजाची कौटुंबिक रचना. **११)** आदिवासी समाजाची सामाजिक संघटना. **१२)** समुदाय आणि शिक्षण **१३)** आदिवासी समुदायांची कला सादर करणे **१४)** आदिवासी समाजाची कला आणि हस्तकला **१५)** समुदाय आणि विकास **१६)** समुदाय आणि आधुनिक तंत्रज्ञान **१७)** समुदाय आणि राष्ट्रवाद **१८)** फील्डवर्क, दस्तऐवजीकरण आणि संग्रहण **१९)** आदिवासी भाषा **२०)** आदिवासी समाजाचे लोकसाहित्य **२१)** मौखिक कथांमधील शैली **२२)** वाद्ये आणि गाणी.

**संशोधन प्रकल्पांच्या श्रेणी:-** आदिवासी अध्यासन केंद्र अंतर्गत १ वर्ष कालावधी करिता लघु संशोधन प्रस्ताव मागविण्यात येत आहे. या अंतर्गत संशोधक एक इलाका (भाग) अंतर्गत गावामधील आदिवासी संस्कृती व जीवनपद्धती या संदर्भात माहिती संकलित करून लिखित व विडीओ दस्तावेजात अंतिम संशोधन प्रस्ताव गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे सादर करील. लघु संशोधन प्रस्ताव अंतर्गत संशोधक विद्यार्थ्यास प्रती महिना रु.१०,०००/- संशोधन अनुदान असणार.

**अर्ज कसा करावा:-**

१) आदिवासी अध्यासन केंद्र अंतर्गत गोंडवाना विद्यापीठ संकेतस्थळ व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वर संशोधक विद्यार्थी करिता 'Call for Proposal' मागविण्यात येईल.

२) संशोधक विद्यार्थ्यांनी 'Call for Proposal' मधील सलग्नीत माहिती व प्रपत्रनुसार ऑनलाइन/ऑफलाइन अर्ज. (समन्वयक, आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम.आय.डी.सी रोड कॉम्प्लेक्स, महाराष्ट्र – ४४२६०५) यांच्या नावे सादर करावा.

किवा Email- tribalstudiescenter@unigug.ac.in वर पाठवावे.

३) अर्जदारांनी विहित नमुन्यात आणि तपशीलवार संशोधन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

**संशोधन प्रस्ताव मान्यतेची प्रक्रिया:**

१) आदिवासीअध्यासन केंद्राद्वारे प्राप्त संशोधन प्रस्तावाची छाननी समिती द्वारे अर्जांची छाननी केली जाईल. सुधारणेसाठी काही सूचना असल्यास, सादरीकरणापूर्वी त्या संशोधकास पाठविल्या जातील.

२) छाननी समिती द्वारे निवड केलेल्या संशोधन प्रस्तावास Interview प्रक्रिया करिता निवड होईल व तज्ञ समितीसमोर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनसाठी आमंत्रित केले जाईल.

३) Interview प्रक्रीये नंतर निवड झालेल्या अंतिम संशोधन प्रस्तावाची माहिती विद्यापीठ संकेतस्थळ वर प्रकाशित केल्या जाईल.

४) निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांचे कार्यशाळा आयोजित करून त्यांना करावयाच्या कामाची दृष्टि दिल्या जाईल.

५) अंतिम संशोधक विद्यार्थ्यास आदिवासी अध्यासन केंद्र द्वारे मार्गदर्शकची नेमणुक करून दिल्या जाईल.

**संशोधन प्रस्ताव संदर्भातील मार्गदर्शक तत्वे:-**

१) संशोधनाचे क्षेत्र किंवा केंद्र प्रामुख्याने गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण आणि आदिवासी भाग असणे अपेक्षित आहे.

२) संशोधांचे कार्य सुरु करण्यापूर्वी संशोधन करण्यास इलाका प्रमुख/ ग्रामसभा प्रमुख/ ग्रामपंचायत ची मान्यता असावी.

३) संशोधकास सहकार्य करण्याकरिता अध्यासन केंद्रद्वारे मार्गदर्शक ची नेमणुक करण्यात येईल.

४) संशोधक विध्यार्थ्यानी मासिक प्रगती अहवाल सादर करणे अनिवार्य आहे.

५) संशोधक आणि मार्गदर्शक हे लघु संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जबाबदार असतील.

६) संशोधन प्रस्ताव आणि अंतिम अहवाल मराठी, हिंदी किंवा इंग्रजीत भाषेमध्ये असावेत.

**संशोधकास अनुदान देण्याबाबात:-**

१) रिसर्च फेलोशिप रु.१०,०००/- प्रती महिना (फक्त बारा महिन्यांसाठी) संशोधक विद्यार्थ्यास दिली जाईल, मंजुरी पत्रात नमूद केल्याप्रमाणे संशोधकास क्षेत्रीय कार्य आणि अहवाल लेखनासाठी कोणतीही अतिरिक्त रक्कम दिली जाणार नाही.

२) रिसर्च फेलोशिप दरमहा प्रगती अहवाल सादर केल्यानंतर जारी केली जाईल आणि अंतिम हप्ता लघु संशोधन प्रकल्पाच्या अंतिम सादरीकरण नंतरच दिल्या जाईल.

३) आदिवासी अध्यासन केंद्र द्वारे अधिकृत रिसर्च फेलोशिपमधून संशोधन विद्यार्थ्यांचे सर्व फील्ड काम संबंधित खर्च पूर्ण करणे अपेक्षित आहे.

४) अंतिम अहवाल, लेखापरीक्षित स्टेटमेंट ऑफ अकाउंट्स विहित नमुन्यात, सर्व प्रगती अहवालांची पडताळणी, अंतिम सारांश आणि इतर आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्यासाठी तज्ञांच्या शिफारसी असणे अनिवार्य आहे.

**संशोधन प्रकल्पांचे निरीक्षण:-**

१) आदिवासी अध्यासन केंद्र 'सल्लागार मंडळ' द्वारे लघु संशोधन प्रस्ताव प्रगती व अंतिम मूल्यमापन वर नियंत्रण ठेवण्यात येईल.

२) संशोधनाचे मासिक प्रगती अहवाल विहित नमुन्यात सादर करून पुनरावलोकन केले जाईल आणि संशोधन प्रगती असमाधानकारक आढळल्यास किंवा संशोधक कडून अपेक्षित कार्य, नियमांचे उल्लंघन झाल्यास संशोधकाचे मानधन थांबविण्याबाबत सर्वस्वी अधिकार गोंडवाना विद्यापीठ कडे राखीव आहेत.

३) अंतिम संशोधन प्रस्ताव अंतर्गत (व्हिडिओ आणि ऑडिओ) सत्यता ही ग्रामसभा अध्यक्ष किंवा सरपंच यांच्या मान्यतेचे पत्र मान्यते नंतर सादर करावे.

४) जर संशोधक आवश्यक कागदपत्रे आणि अंतिम अहवाल सादर करण्यात अयशस्वी झाले किंवा निर्धारित कालावधीत प्रकल्प पूर्ण न केल्यास मिळालेली निधी संशोधकांना परत करावी लागेल व नाव Black List यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

**संशोधन पूर्ण करणे:-**

१) संशोधन पूर्ण झाल्यावर, संशोधक विहित नमुन्यात व नाहरकत प्रमाणपत्र सोबत अंतिम अहवाल सादर करेल.

२) संशोधकांनी सादर केलेला अंतिम अहवाल आदिवासी अध्यासन केंद्र द्वारे नियुक्त केलेल्या तज्ञाद्वारे स्वीकृतीच्या अंतिम शिफारसीनंतरच मान्य केल्या जाईल.

**३)** या योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या संशोधनाचे निष्कर्ष, अहवाल प्रकशित करण्याचे संपूर्ण अधिकार गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली कडे राखून असतील**.**

डॉ.वैभव मसराम
समन्वयक, आदिवासी अध्यासन केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
## आदिवासी अध्यासन केंद्र
लघु संशोधन प्रस्ताव : रिसर्च फेलोशिप २०२6-२६

**<u>संशोधन फेलोशिपसाठी अर्ज</u>**

Photo

**प्रति,**

**मा. समन्वयक,**
आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५, महाराष्ट्र.

**विषय : लघु संशोधन प्रस्ताव : संशोधन फेलोशिप २०२५-२६ अंतर्गत संशोधन फेलोशिप मिळण्याबाबत.**

आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्यामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या **"लघु संशोधन प्रस्ताव: रिसर्च फेलोशिप २०२५-२६"** या योजनेअंतर्गत मी माझा संशोधन प्रस्ताव सादर करीत आहे. माझ्या अर्जाचा व संशोधन प्रस्तावाचा नियमानुसार विचार करण्यात यावा, ही विनंती.

### अर्जदाराची वैयक्तिक माहिती

१. **अर्जदाराचे संपूर्ण नाव :**

२. **जन्मतारीख :**

३. **सामाजिक प्रवर्ग :**

४. **मोबाईल क्रमांक :**

५. **ई-मेल :**

**पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :**

---

---

### शैक्षणिक पात्रता

| परीक्षा | विषय | विद्यापीठ / संस्था | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|---|
| पदवी | | | | |
| पदव्युत्तर | | | | |
| इतर | | | | |

**पदव्युत्तर शिक्षण घेतलेले गोंडवाना विद्यापीठाचे विभाग / संलग्न महाविद्यालय :**

## <u>प्रस्तावित संशोधनाची माहिती</u>

**१. संशोधन प्रकल्पाचे शीर्षक**

---

---

**२. संशोधनाचे प्रमुख क्षेत्र**

☐ गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी जमातींची नातेसंबंध पद्धती

☐ गोंड-माडिया सगा व्यवस्था (गडचिरोली जिल्हा)

☐ माडिया विवाह परंपरा (भामरागड व एटापल्ली तालुका)

☐ गोटूल परंपरा (भामरागड व एटापल्ली तालुका)

**३. संशोधन करण्यात येणारा आदिवासी समुदाय :**

---

**४. संशोधनाचे प्रस्तावित क्षेत्र**

**जिल्हा :**

______________________________________________________________

**तालुका :**

______________________________________________________________

**इलाका / भौगोलिक क्षेत्र :**

__________________________________________________

**प्रस्तावित गावांची माहिती:**

__________________________________________________

---

## <u>स्थानिक भाषा व क्षेत्रीय अनुभव</u>

**१. अर्जदारास स्थानिक / आदिवासी भाषेचे ज्ञान आहे का?** ☐ होय ☐ नाही

**भाषेचे नाव :** ____________________________________________

**२. भाषांमधील प्राविण्य:** ☐ **बोलणे** ☐ **वाचणे** ☐ **लिहिणे**

**३. संबंधित आदिवासी समुदाय / क्षेत्रामध्ये पूर्वीचा अनुभव असल्यास नमूद करावा.**

---

---

## <u>जोडपत्रांची यादी</u>

अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत:

☐ १. अर्ज ☐ २. सविस्तर संशोधन प्रस्ताव ☐ ३. पदव्युत्तर परीक्षेची गुणपत्रिका / प्रमाणपत्र

---

## अर्जदाराचे घोषणापत्र

मी घोषित करतो / करते की, या संशोधन प्रस्तावामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार सत्य, अचूक व वस्तुनिष्ठ आहे. प्रस्तुत संशोधन प्रस्ताव हा माझ्या स्वतंत्र विचार, अभ्यास व संशोधन संकल्पनेवर आधारित असून तो कोणत्याही एम.फिल. / पीएच.डी. अथवा इतर कोणत्याही सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पाचा भाग नाही. तसेच, प्रस्तुत संशोधन प्रस्तावाची संकल्पना, मांडणी व लेखन करताना कोणत्याही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) साधनाचा वापर करून मजकूर तयार केलेला किंवा त्यावर अवलंबून राहून प्रस्ताव सादर केलेला नाही. प्रस्तावातील माहिती, संकल्पना व मांडणीची संपूर्ण जबाबदारी माझी राहील.

**ठिकाण :** **अर्जदाराची स्वाक्षरी :** ______________________

**दिनांक :** ____ / ____ / २०२६ **अर्जदाराचे नाव :** ______________________

---

## कार्यालयीन वापरासाठी

**अर्ज क्रमांक :** **अर्ज प्राप्त दिनांक :** ____ / ____ / २०२६

समन्वयक, आदिवासी अध्यासन केंद्र

# रिसर्च फेलोशिप प्रस्ताव लिहण्यासंदर्भातील मार्गदर्शक सुचना

**(Annexure–II)**

## भाग १ : प्रस्ताव मुखपृष्ठ

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**
**आदिवासी अध्यासन केंद्र**

**लघु संशोधन प्रस्ताव: रिसर्च फेलोशिप २०२५–२६ (टप्पा II)**
**आदिवासी भाषा, इतिहास, संस्कृती, पारंपरिक ज्ञान आणि जीवनपद्धतीचे दस्तऐवजीकरण व संवर्धन**

**संशोधन प्रस्तावाचे शीर्षक :**
**सादरकर्ता**

अर्जदाराचे नाव :
शैक्षणिक पात्रता :
पदव्युत्तर विभाग / संलग्न महाविद्यालय :
संशोधनाचे क्षेत्र / इलाका :
जिल्हा :

आदिवासी अध्यासन केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स,
गडचिरोली – ४४२६०५, महाराष्ट्र

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२७

---

## भाग -२ : रिसर्च फेलोशिप प्रस्तावाचा आराखडा

### १. संशोधनाची प्रस्तावना / पार्श्वभूमी

खालील बाबींचा समावेश करावा :

- विषयाची पार्श्वभूमी
- संशोधनाची गरज व आवश्यकता
- आदिवासी समाजाच्या संदर्भातील विषयाचे महत्त्व
- प्रस्तावित संशोधन क्षेत्राची थोडक्यात माहिती
- संबंधित आदिवासी समुदायाची प्राथमिक माहिती

---

### २. संशोधन समस्या

खालील बाबी स्पष्ट कराव्यात :

- संशोधनाची मुख्य समस्या
- कोणत्या प्रश्नाचा / समस्येचा अभ्यास केला जाणार आहे?

- सदर अभ्यासाची आवश्यकता काय आहे?
- विद्यमान परिस्थितीमध्ये कोणती समस्या / पोकळी आढळते?

---

**३. संशोधनाची उद्दिष्टे**

संशोधनाची **४ ते ५ स्पष्ट उद्दिष्टे** नमूद करावीत.

---

**४. संशोधनाची गृहीतके**

संशोधनाशी संबंधित **४ ते ५ स्पष्ट गृहीतके** मांडावीत.

---

**५. संशोधनाचे महत्त्व**

खालील बाबी स्पष्ट कराव्यात :

- हा अभ्यास का आवश्यक आहे?
- आदिवासी समाजासाठी या संशोधनाचे महत्त्व
- शैक्षणिक महत्त्व
- सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व
- पारंपरिक ज्ञानाच्या संवर्धनातील योगदान
- भविष्यातील संशोधनासाठी उपयोगिता

---

**६. संशोधनातील नाविन्य / संशोधनातील पोकळी:** पूर्वी या विषयावर झालेले संशोधन थोडक्यात स्पष्ट करून प्रस्तावित अभ्यासाचे नाविन्य, वेगळेपणा आणि संशोधनातील पोकळी (Research Gap) स्पष्ट करावी.

---

## भाग -३ : संशोधन पद्धती

**१. संशोधन पद्धती / संशोधन आराखडा**

प्रस्तावित संशोधनासाठी वापरण्यात येणारी संशोधन पद्धती व तिची निवड करण्यामागील कारणे स्पष्ट करावीत.

**२. माहिती संकलनाच्या पद्धती**

**३. प्रस्तावित माहितीदार / सहभागींची संख्या**

एकूण प्रस्तावित माहितीदार / सहभागी :

**निवडीचा आधार / पद्धत :**

**४. क्षेत्रकार्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या भाषा**

---

## भाग – ड : संशोधन क्षेत्र व दस्तऐवजीकरणाचा आराखडा

**१. इलाका / भाग**

**२. निवडलेली गावे**

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|

**३.संबंधित आदिवासी समुदाय**

**४. अभ्यासाचा कालावधी**

**५. दस्तऐवजीकरणाची योजना**

दस्तऐवजीकरणाची सविस्तर योजना **:**

---

## भाग -४ : समुदायाची संमती व आवश्यक परवानगी

**१. समुदायाशी पूर्वपरिचय**

**२. ग्रामसभा / ग्रामपंचायत / इलाका प्रमुख यांची परवानगी**

**३. माहितीदार / सहभागींची संमती:** मुलाखत, छायाचित्र, ध्वनी व व्हिडिओ दस्तऐवजीकरणासाठी संबंधित व्यक्ती / समुदायाची पूर्वसंमती.

---

## भाग - ५ : १२ महिन्यांचा संशोधन कार्यआराखडा

वर्षभर करण्यात येणाऱ्या संशोधन कार्याची महिनानिहाय मांडणी करावी.: कालावधी /प्रस्तावित संशोधन कार्य / अपेक्षित निष्पन्न

---

## भाग-६ : संशोधनातून अपेक्षित निष्पन्न

संशोधन पूर्ण झाल्यानंतर अपेक्षित निष्पन्न खालीलप्रमाणे स्पष्ट करावे :

**१. आदिवासी अभ्यासासाठी योगदान**

**२. स्थानिक / पारंपरिक ज्ञानाच्या संवर्धनासाठी योगदान**

**३. भावी संशोधकांसाठी संदर्भसामग्री**

**४. विद्यापीठाच्या डिजिटल संग्रहासाठी योगदान**

**५. लिखित दस्तऐवजीकरण**

**६. ऑडिओ / व्हिडिओ दस्तऐवजीकरण**

**७. इतर अपेक्षित निष्पन्न**

---

## भाग-७ : संदर्भ व पुरावे

**१. संदर्भग्रंथ / संशोधन साहित्य:** प्रस्ताव तयार करण्यासाठी वापरलेल्या संदर्भांची यादी निर्धारित संदर्भशैलीनुसार द्यावी.

**२. छायाचित्रे / प्राथमिक क्षेत्रीय पुरावे:** प्रस्तावाशी संबंधित उपलब्ध प्राथमिक छायाचित्रे / क्षेत्रीय पुरावे येथे जोडावेत.

---

**समन्वयक, आदिवासी अध्यासन केंद्र**